|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव)

## निवडणूक शाखा

जा.क्र.कबचौउमवि/२/निवडणूक/७७९/२०२२ दिनांक : ०७/१२/२०२२

प्रति,

**मा.संचालक / विभागप्रमुख,**
**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या**
**सर्व प्रशाळा / विभाग**

**विषय :- विद्यापीठ अध्यापकांच्या गटामधून अधिसभेवर निवडून द्यावयाच्या सदस्यांच्या गटासाठी नामनिर्देशन अर्जाच्या छाननी बाबत.**

महोदय/महोदया,

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ नुसार विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणांच्या निवडणुका घेण्यासाठी अधिनियमातील तरतुदीन्वये विद्यापीठाने प्रसिध्द केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार विद्यापीठ अध्यापकांच्या गटांमधून कायदा कलम २८ (२) (ध) नुसार अधिसभेसाठी निवडून द्यावयाच्या सदस्यांसाठी निवडणूक सूचना दि.०७/१२/२०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आली असून त्या अनुषंगाने दिनांक १५ व १६ डिसेंबर, २०२२ रोजी विद्यापीठास विद्यापीठ अध्यापकांच्या गटामधून नामनिर्देशन अर्ज प्राप्त होणार आहेत.

उपरोक्त अनुषंगाने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ चा सन २०१७ चा एकरुप परिनियम क्र.१ मधील कलम १० (६) नुसार नामनिर्देशन अर्जांची छाननी खालील ठिकाणी करावयाचे विद्यापीठाने निश्चित केले आहे :

| नामनिर्देशन अर्जांच्या छाननीचे ठिकाण | दिनांक व वेळ |
|---|---|
| **कुलसचिव कार्यालय** | **१७ / १२/ २०२२ रोजी दुपारी १२.३० वाजता** |

या संदर्भात आपणास कळविण्यात येते की, उमेदवार किंवा उमेदवाराव्दारे लिखीत स्वरुपात योग्य पध्दतीने प्राधिकृत करण्यात आलेली, आणि ज्याचे नाव अंतिम मतदार यादीत समाविष्ट आहे, असा उमेदवाराचा प्रतिनिधी हे अशा छाननीच्या वेळी उपस्थित राहण्यास हक्कदार असतील, याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे,

आपला विश्वासू,

**( डॉ. विनोद पाटील)**
कुलसचिव तथा
निवडणूक निर्णय अधिकारी

पत्र पेटी क्र. : ८०, उमविनगर, जळगाव, दूरध्वनी क्र. ०२५७ २२५७३४८ Post Box No. : 80, Umavinagar, Jalgaon Telephone No. : 0257 2257348 Fax Nos. : 0257-2258403, 406 e-mail Id : election2022@nmu.ac.in